॥श्री राम समर्थ॥
॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १९४ वा | शनिवार, दि. ०७ मार्च २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

कृषी विषयक
मिरची, सिमला मिरची, पपई, वांगी, कलिंगड, खरबूज, काकडी पिकांवरील थ्रिप्स, पांढरी माशी, कोळी, व्हायरस, चुरडा-मुरडा नियंत्रणासाठी, जलद वाढ, फुटव्यासाठी, पिकांची रोगप्रतिकारक, किड प्रतिबंधक शक्ती, उष्णतेचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्यासाठी एकमात्र अनुभवसिध्द औषधी 'प्रतिकार', 'प्रहार', 'प्रतिबंध' महाराष्ट्रात कोठेही पाठवले जाईल.
संपर्क :
कुदरत ॲग्रो ऑरगॅनिक्स
9970115450


# 'कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी की बँकांसाठी?'

## शेतकरी नेत्यांची सरकारवर टीका

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** अर्थसंकल्प मांडत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जी शेतकरी कर्जमाफी जाहीर केली आहे, ती तकलादू आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा विश्वासघात करणारी आहे.

ऑक्टोबर महिन्यात आम्ही आंदोलन केले होते, तेव्हा सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात बारा कोरा करण्याचा पुनरुच्चार केला होता. पण प्रत्यक्षात कर्जमाफी जाहीर केली, त्याला काही अर्थ राहिलेला नाही, अशी टीका शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी केली.



विधिमंडळात राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा कर्जमाफीची घोषणा केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा थेट लाभ मिळणार असून, या योजनेचे नामकरण 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' असे करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत होते, अशा पात्र शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. जे शेतकरी आपल्या कजार्चे हप्ते वेळेवर आणि नियमितपणे भरत आहेत, अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५०,००० रुपयांचे अनुदान देण्यात (पान 2 वर..)

# ॲग्रीवाईज परिषदे मुळे कृषी उत्पादनाला जागतिक बाजारपेठेत संधी - जुआन बेनावेंटे

### पीसीईटीच्या पुणे बिजनेस स्कूल मध्ये ५ वी ॲग्री वाईज राष्ट्रीय परिषद संपन्न

**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):-** पारंपरिक शेती पद्धतीत बदल करून प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केला, तर कृषी उत्पादनात आणि दर्जा मध्ये निश्चित वाढ होत आहे. तसेच ॲग्रीवाईज परिषद मुळे शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनाला जागतिक बाजारपेठेत संधी मिळेल. त्यातून ग्रामीण विकासाचे ध्येय साध्य करता येईल. त्यासाठी अनुभव संपन्न शेतकरी, संशोधक, शेती उत्पादन विक्री करण्यासाठी असणारे वितरक, उद्योजक यांनी योग्य समन्वय साधला पाहिजे असे मार्गदर्शन स्नेल इंटिग्रल प्रा. लि. चे एपीएसी प्रमुख (पान 2 वर..)





# संत बाळूमामा उत्सवानिमित्त बेलाटी येथे विविध कार्यक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील श्री संत बाळूमामा मंदिरात ९ ते २० मार्च या कालावधीत विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील बेलाटीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.




दरवर्षीप्रमाणे यंदाही आदमापूरप्रमाणेच बेलाटी येथील विजापूर बायपास रोड जवळील श्री संत बाळूमामा मंदिर ट्रस्टतर्फे संत बाळूमामा उत्सव साजरा करण्यात येणार आहे.सोमवार,९ मार्च रोजी मंदिरामध्ये वात घालणे व वीणापूजन कार्यक्रम होणार असून याच दिवशी उपवासास सुरुवात होईल. सोमवार,१६ मार्च रोजी उत्सवाची सांगता व उपवास सोडण्यात येईल.

९ ते १६ मार्च या कालावधीत मंदिरात कीर्तन, भजन, महाआरती व महाप्रसाद यांच्यासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.रविवार,१५ मार्च रोजी श्री संत बाळूमामा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.बुधवार,१८ मार्च रोजी

अमावास्यानिमित्त सकाळी ६ वाजता संत बाळूमामांच्या मूतीर्ला अभिषेक, सकाळी ७ वाजता महाआरती व महाप्रसाद होणार आहे. सकाळी ७ ते सायंकाळी ७ या वेळेत दिवसभर धनगरी ओव्या, भजन (पान 2 वर..)




## संपादकीय

# 'एआय'प्रणीत जैविक अस्त्रांचा धोका !

दर वर्षी जगापुढील शस्त्रास्त्रांच्या धोक्यांची चर्चा करण्यासाठी 'म्युनिक सुरक्षा परिषद' भरत असते, त्या परिषदेत यंदा चर्चेत आलेला एक गंभीर धोका म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चा वापर वाढल्यामुळे जनुकांमध्ये बदल घडवून पुढल्या काळात जैव-अस्त्रांचा प्रसार केला जाऊ शकतो. त्यामुळे यापुढल्या काळात, संसर्गजन्य रोगाचे जंतू नैसर्गिक आहेत की मानवनिर्मित, ते चुकून सोडले गेले आहेत की जाणूनबूजून, याविषयीची अनिश्चितता वाढतच जाईल. त्या साऱ्या धोक्यांसाठी आपल्याला तयार राहावे लागेल.

'म्युनिक सुरक्षा परिषद' ही १९६३ पासून भरणारी परिषद. प्रामुख्याने 'नेटो' देशांच्या शस्त्रसज्जतेची, त्या देशांपुढील धोक्यांची चर्चा या परिषदेत होत असे, पण शीतयुद्धानंतरच्या काळात ती अधिक व्यापक स्वरूपाची होऊन शांततामय साहचर्य हे तिचे महत्त्वाचे ध्येय ठरले. तरीही चर्चा अर्थातच, शस्त्रास्त्रस्पर्धा आणि प्रत्यक्ष भू-राजकीय धोके यांच्याविषयीच अधिक होत राहिल्या. जैविक अस्त्रांसारखे विषय गेल्या काही वर्षांत अधूनमधून आले. पण यंदा मात्र 'एआय' आणि जैविक अस्त्रे हा विषय लक्ष वेधून घेणारा ठरला. विशेषतः राज्यबाह्य घटकांनी (अतिरेकी संघटनांनी) विकसित केलेल्या जैव-अस्त्रांच्या शक्यतेने चर्चेचा केंद्रबिंदू जागतिक आरोग्य सुरक्षेच्या दुर्लक्षित विषयाकडे वळवला. या धोक्याचा शोध घेण्यासाठी आणि त्याला प्रतिसाद देण्यासाठी आपल्याकडे कोणती क्षमता आज आहे, उद्याच्या काळात किती आणि कशा प्रकारची वाढीव क्षमता आवश्यक असेल, यावर आता धोरणकर्ते लक्ष केंद्रित करत आहेत, ही समाधानाची बाब ठरते.

अर्थात, संसर्गजन्य रोगजंतू मानवनिर्मित आहे की जाणूनबूजून सोडण्यात आला आहे, हे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने फारसे महत्त्वाचे नसते. जीव वाचवणे आणि आरोग्य संरक्षित करणे हे सार्वजनिक आरोग्याचे काम अशा वेळी असते, पण नवनवे रोग येण्याआधीच त्यांना प्रतिबंध करणे हेही सार्वजनिक आरोग्य क्षेत्राचे कर्तव्यच. त्यामुळे आपण संसर्गजन्य धोक्यांचा शोध घेण्यासाठी आणि त्यांना प्रतिसाद देण्यासाठी कितपत तयार आणि सक्षम आहोत, याची चर्चा कोणत्याही काळात महत्त्वाचीच ठरते.

चांगली गोष्ट अशी की, संसर्गजन्य धोक्यांपासून सामूहिक संरक्षण करण्यासाठी धोरण-आखणीच्या दिशेने कोविड महासाथीनंतर प्रगती झाली आहे. सुमारे वर्षभरापूर्वी जागतिक आरोग्य संघटनेच्या सदस्य राष्ट्रांनी 'महासाथ (प्रतिसाद/ प्रतिबंध) समझोता' स्वीकारण्यासाठी मतदान केले. तो समझोता अद्याप मार्गी लागलेला नसला आणि बारकाव्यांबाबतच्या वाटाघाटी सुरूच असल्या तरीही, या महत्त्वपूर्ण मुद्द्यावर बहुपक्षीय सहकार्यासाठी बरेच देश तयार आहेत, हे स्वागतार्हच नाही का?

'गावि' म्हणजे 'ग्लोबल अलायन्स फॉर व्हॅक्सीन अ‍ॅण्ड इम्युनायझेशन' (लसीकरण, प्रतिबंधासाठी जागतिक युती) या संस्थेशी प्रस्तुत लेखिकेचा संबंध आहे, ती संस्था आणि 'सेपी' म्हणजे 'कोअ‍ॅलिशन फॉर एपिडेमिक प्रिपेअर्डनेस इनोव्हेशन्स' (महासाथ प्रतिबंधक नवकल्पनांची आघाडी) या दोन्ही संस्था कोविडनंतरच्या काळात विकसित झाल्या आहेत. या दोन्ही संस्था आता संसर्गजन्य धोक्यांपासून जगाचे रक्षण करण्यासाठी एकत्रितपणे काम करतात. 'सेपी'चे तज्ज्ञ संभाव्य धोक्यांचा शोध घेऊन त्यावर मात करण्यासाठी कल्पना व संशोधन यांचा समन्वय साधू पाहातात. तर 'गावि' ही संस्था आता लसींची गरज असलेल्या प्रत्येकासाठी योग्य लसी उपलब्ध करून देण्यास मदत करते. त्यादृष्टीने लसींचा साठा करणे, प्रसंगी निधी पुरवणे आणि लस उत्पादन ठिकठिकाणी व्हावे म्हणून प्रारंभिक गुंतवणूक करणे हेदेखील आता 'गावि' करते.

आरोग्यावरचा किंवा तातडीच्या उपाययोजनांवरचा खर्च वाढत असताना त्याकडे दुर्लक्ष करून 'संभाव्य धोके' कसले पाहाता, यासारखे आक्षेप इथे गैरलागू ठरतात कारण मुळात संसर्गजन्य रोग हे मानवजातीला धोका निर्माण करणारे आहेत. त्यापासून बचाव करण्यासाठी कुणाचातरी पुढाकार आवश्यकच आहे. जेव्हा हे धोके आजच्याइतके मोठे नव्हते, तेव्हाही पारंपारिक आरोग्यसेवा आणि क्षमतांमधील गुंतवणुकीसाठी हात आखडता घेणारे होतेच. जागतिक आरोग्य संघटनेला केले जाणाऱ्या अर्थसाह्यातही अनेक देशांनी कपात केल्यामुळे आपण सर्वजण धोक्यात आहोत. नेमक्या अशा वेळी नवनव्या संभाव्य संसर्गजन्य आजारांना आणि जैव-दहशतवादी धोक्यांना तोंड देण्यासाठी आपल्याला अधिक निधीची गरज आहे.

यापुढील कोणत्याही महासाथीला व्यापक बहु-घटक प्रतिसादच प्रभावी ठरेल. त्यासाठी संबंधित भागधारक सरावाद्वारे पूर्णपणे तयार असणे, ही तर सर्वकाळची गरज आहे. आपल्या तयारीत आपत्कालीन पुरवठा साखळ्या, लॉजिस्टिक्स आणि साठा व्यवस्थापनापासून ते आंतरराष्ट्रीय सीमा आणि व्यापारापर्यंत सर्वकाही समाविष्ट असायला हवे.

दुसरी तातडीची गरज म्हणजे संशोधक, निधीपुरवठादार, नियामक आणि उत्पादकांसाठी एक औपचारिक, संयुक्त नियोजन यंत्रणा तयार करणे. आपण केवळ वैद्यकीय प्रतिबंधात्मक उपाय विकसित करून भागणार नाही, तर या उपायांनी कमी वेळेत चाचणी/ मंजुरी/ उपलब्धता आणि सार्वत्रिकता या सर्व पायऱ्या पार केल्या पाहिजेत. त्यासाठी विशिष्ट आर्थिक यंत्रणा आवश्यक आहेत.

विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरूनच जैव- प्रतिकार क्षमता वाढवता येतील का, याच्या चाचपणीसाठी जागतिक आरोग्य प्रणालीमध्ये तातडीने नवीन क्षमता जोडणे आवश्यक आहे. साथरोगांच्या शोध आणि भाकितासाठी 'एआय' वापरून, आपण तंत्रज्ञानाच्या क्षमतेतून संभाव्य धोक्याचा मुकाबला करू शकतो. जागतिक आरोग्य संघटनेकडून मिळणारा निधी आक्रसण्याच्या काळात संशोधकांऐवजी 'एआय'वरला खर्च कमी होऊ शकतो.

त्याचप्रमाणे, मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या साथीच्या आजारांसाठी किंवा महासाथींसाठी तातडीच्या निधीची उपलब्धता सुनिश्चित करण्यावर आपले लक्ष केंद्रित राहिले पाहिजे. या उद्देशाने, 'गावि'ने अलीकडेच 'फर्स्ट रिस्पॉन्स फंड' - स्थापन केला आहे. हा निधी एखाद्या प्रादुर्भावाच्या किंवा आणीबाणीच्या वेळी जलद उपलब्ध होऊ शकतो. या निधीतून अलीकडेच, आफ्रिकेत एमपॉक्सविरुद्ध लसींचे जलद वितरण शक्य झाले.

पण एआय-प्रणीत कृत्रिम संसर्गजन्य धोक्याच्या प्रतिसादासाठी आणखी मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय प्रतिबंधात्मक उपाय आवश्यक असणार, हे निश्चित. या क्षमतावाढीसाठी निधी कसा पुरवायचा हा प्रश्न, बदलत्या जगात तीव्र होत जाणार आहे. आरोग्य संरक्षणासाठी सामूहिक जबाबदारीची गरज असते. त्यासाठी समन्वय सुधारणे आणि शाश्वत व विश्वासार्ह निधीपुरवठ्यासाठी एक संरचना तयार करणे आवश्यक आहे. यापेक्षा कमी काहीही केल्यास आपत्तीला आमंत्रण मिळेल.

# नारीशक्तीचा जागतिक प्रवास : समतेच्या स्वप्नाकडून सशक्तीकरणाच्या वास्तवाकडे

दरवर्षी ८ मार्च हा दिवस संपूर्ण जगभर 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर स्त्रीच्या संघर्षाचा, कर्तृत्वाचा, स्वाभिमानाचा आणि समतेच्या आकांक्षेचा इतिहास पुन्हा एकदा स्मरणात आणणारा आणि भविष्याच्या दिशेने नवी प्रेरणा देणारा दिवस आहे. १९व्या शतकाच्या अखेरीस आणि २०व्या शतकाच्या प्रारंभी औद्योगिक क्रांतीनंतर स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठू लागला. कामगार चळवळींमध्ये स्त्रियांनी समान वेतन, सुरक्षित कामाचे तास आणि मतदानाचा अधिकार यांसाठी संघर्ष सुरू केला. या संघषार्चे संघटित रूप १९०८ मध्ये अमेरिकेत पाहायला मिळाले. पुढे १९१० मध्ये कोपनहेगन येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत जर्मन समाजवादी नेत्या क्लारा झेटकिन यांनी महिला दिन साजरा करण्याची कल्पना मांडली. १९११ पासून काही देशांत हा दिवस साजरा होऊ लागला आणि १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने अधिकृत मान्यता दिल्यानंतर त्याला जागतिक स्वरूप प्राप्त झाले. अशा ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आजचा महिला दिन हा स्त्रीसमानतेच्या दीर्घ आणि खडतर प्रवासाचा प्रतीकात्मक टप्पा आहे.

भारतीय समाजरचनेत स्त्रीची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. प्राचीन काळात स्त्री ला देवी समान मानले गेले असले, तरी व्यवहारात स्त्रीला अनेक मर्यादा आणि बंधनांचा सामना करावा लागला. मध्ययुगीन काळात सामाजिक रूढी परंपरांनी स्त्रीच्या शिक्षणावर, स्वातंत्र्यावर आणि सहभागावर बंधने आणली गेली होती. तथापि, १९व्या शतकात समाजसुधारकांच्या चळवळींनी या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणण्यास सुरुवात केली. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली; राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेच्या उच्चाटनासाठी लढा दिला; पंडिता रमाबाई यांनी विधवाशिक्षणाचा प्रसार केला. या सुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रीसमानतेचा पाया घातला गेला. स्वातंत्र्यलढ्यातही स्त्रियांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, अरुणा आसफ अली यांसारख्या अनेक महिलांनी नेतृत्व, त्याग आणि धैर्याचे उदाहरण घालून दिले.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा स्पष्ट उच्चार केला. भारतीय राज्यघटनेमधील कलम १४, १५ आणि १६ यांनी कायद्यापुढे समानता, लिंगाच्या आधारावर भेदभावास मनाई आणि समान संधीची हमी दिली. यामुळे स्त्रीच्या अधिकारांना संवैधानिक आधार मिळाला आहे. पुढील काळात स्त्रियांच्या संरक्षणासाठी आणि सशक्तीकरणासाठी अनेक कायदे व योजना राबविण्यात आल्या आहेत. स्त्रीहक्क कायदे, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, मातृत्व लाभ कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा इत्यादींनी स्त्रीसुरक्षेला बळ दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे लाखो महिलांना राजकीय प्रक्रियेत थेट सहभागाची संधी मिळाली आहे. आज ग्रामपंचायतपासून संसदेपर्यंत महिलांचे प्रतिनिधित्व वाढताना दिसते; तरीही संख्यात्मक वाढीबरोबर गुणवत्तापूर्ण आणि प्रभावी सहभागाची आवश्यकता आहे.

शिक्षण हा स्त्रीसशक्तीकरणाचा मूलाधार आहे. मागील काही दशकांत मुलींच्या शालेय प्रवेशदरात लक्षणीय वाढ झाली आहे. उच्चशिक्षणातही मुलींचे प्रमाण वाढत आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, कला आणि संशोधन या सर्व क्षेत्रांत महिलांनी आपली छाप पाडली आहे. विज्ञानक्षेत्रात कल्पना चावला यांचे अंतराळयात्रेतील योगदान प्रेरणादायी ठरले आहे; क्रीडा क्षेत्रात पी. व्ही. सिंधू, मेरी कोम यांनी जागतिक स्तरावर यश संपादन केले आहे; राजकारणात इंदिरा गांधी यांनी देशाचे नेतृत्व केले आहे. या उदाहरणांमधून स्त्रीच्या क्षमतेला योग्य संधी मिळाल्यास ती कोणतेही शिखर गाठू शकते, हे अधोरेखित होते. तथापि, प्रगतीच्या या वाटचालीत अनेक आव्हाने अजूनही कायम आहेत. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांच्या संधींमध्ये तफावत दिसून येते. काही ठिकाणी मुलींचे शिक्षण माध्यमिक स्तरानंतर खंडित होते. लवकर लग्न, कुपोषण, आरोग्यसेवेची अपुरी उपलब्धता, लैंगिक भेदभाव, कौटुंबिक हिंसा, मानवी तस्करी, कार्यस्थळी छळ, वेतनातील असमानता अशी विविध स्वरूपे स्त्रीच्या विकासाला अडथळा निर्माण करतात. डिजिटल युगातही महिलांचा तंत्रज्ञानातील सहभाग तुलनेने कमी आहे. सायबर छळासारख्या नव्या समस्या उभ्या राहत आहेत. म्हणूनच महिला दिन हा केवळ गौरवाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवसही आहे. आर्थिक सशक्तीकरण हा स्त्रीच्या स्वावलंबनाचा कणा आहे. स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांनी बचत, सूक्ष्म वित्त आणि लघुउद्योगाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. हस्तकला, शेतीपूरक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, खाद्यप्रक्रिया उद्योग अशा विविध उपक्रमांत महिलांचा सहभाग वाढत आहे. शहरी भागात उद्योजकतेकडे महिलांचा कल वाढत असून स्टार्टअप संस्कृतीतही त्या पुढे येत आहेत. मात्र, भांडवलाची उपलब्धता, बाजारपेठेचा विस्तार आणि कौशल्यविकास यांसाठी अधिक धोरणात्मक पाठबळ आवश्यक आहे. समान वेतनाची अंमलबजावणी आणि कार्यस्थळी सुरक्षित वातावरणाची हमी देणे ही शासन व समाज दोघांची जबाबदारी आहे. सामाजिक-सांस्कृतिक स्तरावर स्त्रीची प्रतिमा बदलण्याची गरज आहे. माध्यमांमध्ये स्त्रीचे वस्तुकरण टाळणे, मुलगा मुलगी भेदभाव नष्ट करणे, घरगुती जबाबदाऱ्या समसमान वाटून घेणे, पालकत्वाची जबाबदारी दोघांनी स्वीकारणे या मूल्यांचा प्रसार झाला पाहिजे. लिंगसंवेदनशील शिक्षण आणि समाजीकरणामुळे पुढील पिढी अधिक समताधिष्ठित विचार स्वीकारू शकेल. महिला दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि शासन विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात; परंतु या उपक्रमांचा परिणाम वर्षभर टिकणारा असणे महत्त्वाचे आहे.

आजच्या काळात स्त्री नेतृत्वाचे विविध आयाम दिसून येतात. प्रशासन, न्यायव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञान, संरक्षण, कला, साहित्य, माध्यमे अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील महिला सरपंचांनी गावविकासाची दिशा बदलली आहे; स्वयंसेवी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी सामाजिक परिवर्तन घडवून आणले आहे; संशोधक महिलांनी नवकल्पना साकारल्या आहेत. या सर्व उदाहरणांमुळे स्त्रीशक्तीचे व्यापक आणि बहुआयामी स्वरूप स्पष्ट होते. मात्र, प्रतिनिधित्वाची संधी सर्व स्तरांपर्यंत पोहोचावी, यासाठी संरचनात्मक अडथळे दूर करणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवरही महिला सशक्तीकरण हा विकासाचा प्रमुख अजेंडा ठरला आहे. लिंगसमानता ही शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी एक महत्त्वाची संकल्पना आहे. शिक्षण, आरोग्य, आर्थिक संधी, राजकीय सहभाग आणि हिंसामुक्त जीवन या सर्व घटकांचा समावेश लिंगभाव न्यायात होतो. महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक देश आपापल्या प्रगतीचा आढावा घेतो आणि उर्वरित अंतर भरून काढण्यासाठी धोरणे आखतो. भारतानेही 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ', 'उज्ज्वला', 'सुकन्या समृद्धी' यांसारख्या योजनांद्वारे मुलींच्या सक्षमीकरणाचा प्रयत्न केला आहे; परंतु या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती तितकीच गरजेची आहे.

स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न केवळ महिलांचा नसून संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी निगडित आहे. ज्या समाजात स्त्रीला सन्मान, सुरक्षा आणि संधी मिळतात, तो समाज अधिक सर्जनशील, समताधिष्ठित आणि प्रगतिशील बनतो. घर, शाळा, कार्यक्षेत्र आणि सार्वजनिक जीवन या सर्व स्तरांवर लिंगसमानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. पुरुषांनीही या परिवर्तन प्रक्रियेत सक्रिय सहभागी होणे गरजेचे आहे. कारण समानतेची लढाई ही परस्पर विरोधाची नसून सहकार्याची आहे. महिला दिन आपल्याला भूतकाळातील संघर्षांची आठवण करून देतो, वर्तमानातील यशाचा गौरव करतो आणि भविष्याच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करून देतो. आज घोषणांपेक्षा कृतीची, प्रतीकात्मक सन्मानापेक्षा वास्तविक संधींची आणि तात्पुरत्या उत्साहापेक्षा सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे. प्रत्येक मुलीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुरक्षित वातावरण, आरोग्यसेवा आणि स्वप्नपूर्तीची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक महिलेला निर्णयप्रक्रियेत स्थान, आर्थिक स्वावलंबन आणि सन्माननीय आयुष्याचा अधिकार मिळाला पाहिजे.

८ मार्चचा दिवस हा केवळ दिनदर्शिकेतील एक तारीख नसून समाजपरिवर्तनाची प्रेरणा आहे. स्त्रीच्या कर्तृत्वाला मान्यता देताना तिच्या वेदनांना आणि संघर्षांना विसरून चालणार नाही. समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी शासन, समाज आणि कुटुंब या तिन्ही स्तरांवर एकात्मिक प्रयत्नांची गरज आहे. नारीशक्तीचा सन्मान, संरक्षण आणि सशक्तीकरण हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

# कृतीतून शिक्षण : मुलांच्या समज वाढवणारी प्रभावी पद्धत

दप्राथमिक स्तरावर विद्यार्थ्यांना शिक्षण देताना कृतीमूलक पद्धतीचा वापर करणे अत्यंत उपयुक्त ठरते. कारण लहान मुलांना फक्त पाठांतर करून शिकणे अवघड जाते, परंतु प्रत्यक्ष कृतीतून ते विषय अधिक चांगल्या प्रकारे समजून घेतात.

कृतीमूलक शिक्षणामध्ये खेळ, प्रयोग, प्रात्यक्षिके, गटकार्य आणि प्रकल्प यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, गणित शिकवताना मोजणीसाठी वस्तूंचा वापर करणे, पर्यावरण अभ्यासात झाडे-वनस्पती प्रत्यक्ष दाखवणे किंवा भाषेच्या तासात गोष्टी सांगणे यामुळे विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो.


या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो, विचारशक्ती विकसित होते आणि ते स्वतःहून प्रश्न विचारण्यास प्रोत्साहित होतात. तसेच गटामध्ये काम करताना सहकार्याची भावना देखील निर्माण होते.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वयानुसार आणि क्षमतेनुसार विविध उपक्रम तयार करणे आवश्यक आहे. यामुळे शिक्षण अधिक रोचक आणि परिणामकारक होते. म्हणूनच प्राथमिक शिक्षणामध्ये कृतीमूलक शिक्षणाचा वापर केल्यास विद्यार्थ्यांचे शिकणे अधिक आनंददायी आणि परिणामकारक होऊ शकते.

**- श्री. वैभव चंद्रकांत चव्हाण**
उपशिक्षक, जिल्हा परिषद
प्राथमिक शाळा केवड

# अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी रोजगार संधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर आणि सोलापूर टेक्सटाईल डेव्हलपमेंट फाउंडेशन, एम. आय.डी.सी. अक्कलकोट रोड सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अल्पसंख्यांक नोकरी इच्छूक उमेदवारांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.




हा मेळावा मंगळवार, दिनांक 9 मार्च 2026 रोजी सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत "महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर" येथे होणार आहे.

या रोजगार मेळाव्यात 10 वी, 12 वी, आय.टी.आय. वेल्डर, फिटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, प्रिन्सिपल, लिपिक, प्रिंटिंग प्रेस, लूम ऑपरेटर, लाईन मॅनेजर/मार्केटिंग मॅनेजर, हेल्पर मशीन ऑपरेटर, लॅब टेक्निशियन, लॅब इनचार्ज अशा प्रकारच्या एकूण 142 पेक्षा जास्त रिक्त पदांची भरती केली जाणार असून 18 उद्योजकांनी ऑनलाईन अधिसूचना दिली आहे.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी रिज्यूमच्या तीन प्रती व आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी 0217-2992956 या दूरध्वनीवर संपर्क साधावा किंवा https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट द्यावी.

पान १ वरून

## ॲग्रीवाईज परिषदे मुळे...

जुआन बेनावेंटे यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पुणे बिजनेस स्कूल (पीबीएस) मध्ये "वाढती मूल्य आणि त्याचे सशक्तिकरण" या संकल्पनेवर आधारित "पाचवी ॲग्री वाईज राष्ट्रीय परिषद २०२६" चे आयोजन करण्यात आले होते. कृषी व ॲग्रिबिझनेस क्षेत्रातील नवोन्मेष, शाश्वतता आणि भविष्यातील संधी या विषयांवर चर्चा करण्यासाठी देशभरातील उद्योग तज्ज्ञ, प्रतिनिधी, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी पोल्ट्री फेडरेशन ऑफ इंडियाचे संयुक्त सचिव रिकी थापर, एव्हीपी व स्ट्रॅटेजिक मार्केटिंग प्रमुख पुष्कल उपाध्याय, दीपक फटीर्लायझर अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशनचे अमित खरे, न्यूट्रीवाईस ग्लोबल फूड ॲडव्हायझरी सर्विसेसचे अध्यक्ष अरबिंद दास, महाधन ॲग्रीटेक लि. चे वरिष्ठ व्यवस्थापक निधी सिंह, जफ्फा कॉन्फिड इंडिया प्रा.लि.चे एचआर विनायक दर्पे, कान बायोसिस प्रा.लि. आंतरराष्ट्रीय व्यवसाय विकास व्यवस्थापक सागर अतुल शाह, फ्राटेली फ्रुट्स मुख्य कृषीतज्ञ विश्वजित मोरे, पीबीएस चे संचालक डॉ. गणेश राव, डीन डॉ. मिनाक्षी त्यागी, प्रा. सागर लोखंडे, प्रा. पूजा माणके आणि प्रा. प्राजक्ता सांधिकार आदी उपस्थित होते.

पीबीएस चे संचालक डॉ. गणेश राव यांनी सांगितले की, ही राष्ट्रीय परिषद उद्योजक आणि शैक्षणिक संस्था, संशोधक, विद्यार्थी यांच्या मध्ये अधिक भक्कम समन्वय करण्यासाठी, ज्ञान विनिमय आणि सहकार्याला चालना देण्यासाठी प्रभावी ठरली. यासाठी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि सर्व सत्रांमधील सक्रिय चर्चा यांमधून भविष्यातील सक्षम ॲग्रि बिझनेस उद्योजक घडविण्याची संस्थेची बांधिलकी अधोरेखित झाली.

डीन डॉ. मिनाक्षी त्यागी यांनी स्वागत, प्रास्ताविक करताना सांगितले की, ॲग्रीवाईज सारख्या उपक्रमांत मिळणाऱ्या मार्गदर्शनामुळे शेती उत्पादनात शाश्वत वाढ होईल. त्यामुळे शेती व शेतीपूरक उद्योग व्यवसायांना आर्थिक पाठबळ मिळेल. यामुळे शेतकरी, संशोधक, उद्योजक, वितरक, व्यापारी आणि ग्राहक यांचे उत्कृष्ट नेटवर्क तयार होईल आणि देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देता येईल असे उपक्रम पुढच्या पिढीला प्रेरणा देतील. तरुण उद्योजकांना शेती संबंधित व्यवसायात करिअर करण्यासाठी आत्मविश्वास निर्माण होईल. विचारांची देवाणघेवाण होऊन विद्यार्थ्यांना पारंपरिक पद्धतीच्या पलीकडे विचार करण्याचा नवा दृष्टिकोन प्राप्त होईल आणि या क्षेत्रातील आव्हानांसाठी नाविन्यपूर्ण उपाय शोधण्यास त्यांना प्रोत्साहन मिळेल असे डीन डॉ.मिनाक्षी त्यागी यांनी सांगितले.

यावेळी मासिक ॲग्रीवाईज च्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. या मासिकामध्ये कृषी व ॲग्रिबिझनेस क्षेत्रातील संशोधनपर लेख, तज्ज्ञांचे विचार आणि उद्योग क्षेत्रातील अनुभवांचा समावेश करण्यात आला आहे.

पीबीएसचे संचालक डॉ. गणेश राव, डीन डॉ. मिनाक्षी त्यागी, प्रा. सागर लोखंडे, प्रा. पूजा माणके आणि प्रा. प्राजक्ता सांधिकार यांनी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीबीएस चे संचालक डॉ. गणेश राव यांनी कार्यक्रम आयोजित करणाऱ्या टीमचे अभिनंदन केले.

## संत बाळूमामा उत्सवानिमित्त बेलाटी येथे...

व पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता महाआरती होईल.

तसेच गुरुवार,१९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रीराम मंदिर भूमिपूजन सोहळा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.शुक्रवार,२० मार्च रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन श्री संत बाळूमामा मंदिरात साजरा करण्यात येणार असून दुपारी १२.३० वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अधिष्ठानाजवळ गुलालाचे कीर्तन होणार आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी सहभागी होऊन कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष पाटील- बेलाटीकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सिद्धारूढ बेडगनूर, कपिल कोळी, बाळासाहेब पाटील, आत्माराम रुपनर आदी उपस्थित होते.

## 'कर्जमाफी शेतकऱ्यांसाठी की बँकांसाठी?'...

येणार आहे. यावरून राजू शेट्टी यांनी सरकारवर टीका केली.

**वरचे पैसे भरायला शिल्लक नाही**

राज्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांचे कर्ज साधारण अडीच ते तीन लाख रुपयांपेक्षा जास्त आहे. व्याजासकट साडे तीन लाखाच्या पुढे गेले आहे. असे असताना दोन लाखांपर्यंत कर्जमाफीचा लाभ तेव्हा मिळेल, जेव्हा वरची रक्कम बँकेत शेतकरी भरेल. परंतु, ऑक्टोबर महिन्यात अतिवृष्टीमुळे आणि शेतीमालाचे भाव पडल्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. वरचे पैसे भरायला शिल्लक नाही. तेव्हा शेतकरी पैसे भरणार तरी कसे?, अशी विचारणा राजू शेट्टी यांनी केली.

**जे नियमित होते, तेही थकीत गेले**

नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्यांची परिस्थिती अशी आहे की, ऑक्टोबर महिन्यात यांनी सांगितले की, आम्ही कर्जमाफी जाहीर करणार आहोत. त्यामुळे जे नियमित होते, तेही थकीत गेले. आता ते थकीत असलेल्यांच्या यादीत गेल्यामुळे ते नियमितच्या यादीतून बाहेर गेले, असे राजू शेट्टी म्हणाले.

दरम्यान, सरकारने केलेली ही कर्जमाफी बँकांसाठी आहे की शेतकऱ्यांसाठी आहे? असा प्रश्न पडतो, अशी टीका त्यांनी केली. तसेच आजचा राज्य सरकारचा अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकडेवारीची फेकाफेक होती. जसे गाजर केंद्र सरकारने दिले, तसे गाजर आता राज्य सरकारने आपल्याला दिले. सरसकट कर्जमाफीची घोषणा केली होती मात्र ही सरसकट कर्जमाफी देत नाही दोन लाखांपर्यंत फक्त कर्जमाफी देणार आहे. शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे, अशी टीका काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी केली.

### वात्रटिका

**पुन्हा शरद ऋतू**

निरभ्र आकाश असते नि
शरदाचे चांदणे पसरते...
पावसाळ्या नंतर हिवाळ्याची
चाहूल कोण विसरते...
वय कितीही वाढले तरी
राज्यसभा मिळत असते...
तारूण्याची कर्तबगारी जरी
पण जेष्ठापुढे ती चालत नसते...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# संभाजी आरमारचा इशारा : कारवाई न झाल्यास आंदोलन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील एन. बी. बंडा प्रशालेचे मुख्याध्यापक एम. डी. बिराजदार यांच्यावर महिला शिक्षिकेला लैंगिक छळ केल्याच्या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतरही त्यांना पुन्हा सेवेत रुजू करून घेतल्याने संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणात मुख्याध्यापक बिराजदार तसेच माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी संभाजी आरमार संघटनेने जिल्हाधिकारी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

संभाजी आरमारच्या निवेदनानुसार, मुख्याध्यापक बिराजदार यांनी संबंधित महिला शिक्षिकेला वारंवार अश्लील संदेश पाठवणे, व्हिडिओ कॉलद्वारे अश्लील हावभाव करणे, रात्री-अपरात्री अयोग्य संदेश पाठवणे तसेच दालनात बोलावून अयोग्य स्पर्श केल्याची तक्रार शिक्षिकेने पोलिसांत दिली होती. त्यानुसार बिराजदार यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात सुरुवातीला शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी बिराजदार यांच्यावर सेवा समाप्तीची कारवाई केली होती. मात्र काही दिवसांतच त्यांना पुन्हा सेवेत रुजू करून घेण्यात आल्याने संबंधित महिला शिक्षिका, शाळेतील इतर महिला कर्मचारी तसेच विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

या पार्श्वभूमीवर मुख्याध्यापक बिराजदार तसेच त्यांना पाठीशी घालणारे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करून त्यांच्यावर फौजदारी कारवाई करावी, अन्यथा संघटनेला रस्त्यावर उतरून आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे. संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, शशिकांत शिंदे, गजानन जमदाडे, अनंतराव नीळ, अमित कदम, सागर ढगे, राज जगताप, रेवणसिद्ध कोळी आदींच्या स्वाक्षऱ्यांनी हे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

# उमेश पाटील यांच्या प्रयत्नांना यश; राष्ट्रीय महामार्गावर सर्व्हिस रोडचे काम सुरू

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मंगळवेढा – सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ वरील मौजे सोहाळे व बेगमपूर परिसरात सर्व्हिस रोड व्हावा, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. या मागणीसंदर्भात सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उमेश पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने संबंधित ठिकाणी सर्व्हिस रोडच्या कामास सुरुवात करण्यासाठी सकारात्मक कार्यवाही केली आहे.



राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून मिळालेल्या पत्रानुसार बेगमपूर येथे सर्व्हिस रोडचे काम ईपीसी कंत्राटदारामार्फत सुरू करण्यात आले आहे. तसेच मौजे सोहाळे येथे जमीन संपादनासंदर्भातील प्रक्रिया सुरू असून स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेचा व सोयीचा विचार करून सर्व्हिस रोडच्या कामाला गती देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून वाहतुकीची सुरक्षितता आणि सोयीसुविधा वाढण्यास मदत होणार आहे. ग्रामस्थांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

# 'स्वच्छ MIDC सुंदर MIDC' अभियान व पाणपोईचे उद्घाटन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील कारखानदार व उद्योजकांच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात विविध उपक्रमांचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी 'स्वच्छ MIDC सुंदर MIDC' अभियानाची सुरुवात तसेच पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.या कार्यक्रमाला उपमहापौर ज्ञानेश्वरी महेश देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक तथा सोलापूर शहर भाजप अध्यक्षा रोहिणी तडवळकर,स्थायी समिती सभापती रंजिता चकोते यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच तिलोकचंद कासवां (अध्यक्ष, MIDC इंडस्ट्रीज असोसिएशन, सोलापूर) आणि पेंटप्पा गड्डम (अध्यक्ष, सोलापूर यंत्रमाग धारक संघ) चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष राजू राठी, ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, संजय साळुंखे, निलेश पोपलीया, अंबादास बिंगी, नगरसेवक अजय पूनम नगरसेवक, नगरसेवक अक्षय अंजीखाने,प्रमोद दरगड, नितीन करवा,संगीता दायमा, कृष्णा दायमा हे ही उपस्थित होते. यावेळी बोलताना महापौर विनायक कोंड्याल यांनी एमआयडीसी परिसराच्या विकासासाठी शहर मध्यचे आमदार देवेंद्र दादा कोठे यांनी पायाभूत सुविधांसाठी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच सोलापूर महानगरपालिकेच्या माध्यमातून दरवर्षी एमआयडीसी परिसरासाठी ४ कोटी रुपयांचे बजेट ठेवण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमात एमआयडीसी परिसरातील कारखानदार व उद्योजकांसोबत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहनही मान्यवरांनी केला.या कार्यक्रमाचे आयोजन नगरसेवक तथा भाजप उपाध्यक्ष श्रीनिवास रा. दायमा यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाला परिसरातील उद्योजक, कारखानदार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# म्हैसाळ पाणीप्रश्नी सरकार सक्रिय; बंदिस्त पाईपलाईनचा प्रस्ताव





**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत मंगळवेढा तालुक्यातील अनेक गावांना अपुऱ्या दाबाने पाणी मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आणि वाद निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना मुख्य कालव्यावरून थेट बंदिस्त पाईपलाईन टाकण्याचा सुधारित आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

म्हैसाळ योजनेच्या लाभक्षेत्रातील अडचणी सोडविणे तसेच काही नवीन गावांना पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने मंत्री विखे-पाटील यांच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीस आमदार समाधान आवताडे, सचिव (लाभक्षेत्र विकास) डॉ. संजय बेलसरे, कार्यकारी संचालक डॉ. एच. टी. धुमाळ, मुख्य अभियंता काटपल्लीवार, सहसचिव रोशन हटवार, उपसचिव चंद्रशेखर पाटोळे, अधीक्षक अभियंता का. ला. मासाळ, कार्यकारी अभियंता स्व. अ. गोसावी, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, स्वीय सहाय्यक रावसाहेब फटे आदी उपस्थित होते.

बैठकीत मंगळवेढा तालुक्यातील १९ गावांना म्हैसाळचे पाणी अत्यंत कमी दाबाने मिळत असल्याने शेतकऱ्यांना त्याचा उपयोग होत नसल्याची बाब ठळकपणे मांडण्यात आली. अपुऱ्या दाबामुळे पाण्यावरून शेतकऱ्यांमध्ये वारंवार वाद निर्माण होत असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले.

सध्या वितरिका क्रमांक १, वितरिका क्रमांक २ आणि उमदी डी. वाय. द्वारे आठ गावांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र या पद्धतीऐवजी मुख्य कालव्यावरून मंगळवेढा तालुक्यासाठी स्वतंत्र बंदिस्त पाईपलाईन टाकण्याची मागणी करण्यात आली. तसेच शिरसी, मानेवाडी आणि भोसे या गावांचा म्हैसाळ योजनेत समावेश करून त्या भागालाही पाणी देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

### साठवण तलाव भरण्यासाठी नवा आराखडा

शिरनांदगी, पडोळकरवाडी, मारोळी आणि लवंगी येथील साठवण तलाव सध्या लहान पाईपद्वारे भरले जात असल्याने ते पूर्ण क्षमतेने भरत नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे हे तलाव मुख्य कालव्यावरून थेट बंदिस्त नलिकेद्वारे भरून देण्यासाठी सुधारित संकल्पना तयार करण्याचे निर्देश मंत्री विखे-पाटील यांनी दिले.

तसेच उमदी वितरिकेद्वारे सिंचन होत असलेल्या आठ गावांसाठी जत शाखेच्या मुख्य कालव्यावरून थेट स्वतंत्र बंदिस्त पाईपलाईन टाकण्याचा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश देण्यात आले. शिरसी, मानेवाडी आणि भोसे गावांच्या दक्षिण-पश्चिम भागाला स्वतंत्र पाईपद्वारे पाणी देण्यासाठी तातडीने सर्वेक्षण करून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

या निर्णयामुळे मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.


## जाहिर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं. / २०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

अलका सिद्राम ननवरे, वय-६५ वर्षे, धंदा-घरकाम, रा.अंकोली, ता.मोहोळ, जि.सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत अंकोली, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत अंकोली, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा जन्म ता.०१/०६/१९६५ रोजी मौजे अंकोली, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार यांच्या जन्म दाखल्याची ता.०१/०६/१९६५ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून १९६५ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच अलका सिद्राम ननवरे यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे.कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२०/३/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे.कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.५/३/२०२६

लिपीक (शिक्का) हुकुमावरून सही/- तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण

क्र. अभि/कावि नं. / २०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री.युनूस गुलाबरसुल तांबोळी,वय-५६वर्षे,धंदा-नोकरी, रा.रामलाल चौक, सोलापूर, जि.सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत मुंढेवाडी, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत मुंढेवाडी, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचा जन्म ता.३०/०३/१९६९ रोजी मौजे मुंढेवाडी, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार यांच्या जन्म दाखल्याची ता.३०/०३/१९६९ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनीत्यांच्याकडील माहे मार्च १९६९ चे अभिलेखात अर्जदार म्हणजेच युनूस गुलाबरसुल तांबोळी यांचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२०/३/२०२६ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे.ता.५/३/२०२६

लिपीक (शिक्का) हुकुमावरून सही/- तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण

Civil .MA .9/2026

**मोहोळ येथील मे.सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साहेब यांचे कोटांत**

१) पल्लवी जीवनधर भांगे (लग्नाअगोदचे नांव)
पल्लवी सतीश परबत (लग्नानंतरचे नांव), वय-४६वर्षे, धंदा-काही नाही,रा.ओम शिवतेज हाईट्स,स.नं.३४/५/४/२, पी.आय. सी.टी. कॉलेज मागे, धनकवडी, पुणे, महाराष्ट्र-४११०४३.
२) मनिषा जीवनधर भांगे (लग्नाअगोदचे नांव )
मनिषा राजकुमार दुरणे (लग्नानंतरचे नांव), वय-४३ वर्षे, धंदा-घरकाम, रा.महाळुग, ता.माळशिरस, जि. सोलापूर.
३) संतोषी जीवनधर भांगे (लग्नाअगोदचे नांय)
संतोषी महादेव माने (लग्नानंतरचे नांव), वय-४७वर्षे,धंदा-घरकाम, रा.सिध्देवाडी, शेटफळ, ता.मोहोळ,जि.सोलापूर.
४) लक्ष्मी जीवनधर भांगे (लग्नाअगोदचे नांव)
लक्ष्मी राहुल पवार (लग्नानंतरचे नांव), वय-४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा.शेटफळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. } अर्जदार

विरूध्द

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदारांनी अर्जदार नं.१ ते ४ यांचे वडिल जीवनधर शंकर भांगे हे दि.२०/०९/२०२४ रोजी मौजे शेटफळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे मयत झालेले आहेत. कै.जीवनधर शंकर भांगे हे भुतपूर्व भारतीय सैनिक स्थळ सेनेमध्ये शिपाई या पदावर कार्यरत होते. त्यानंतर यातील मयत जीवनधर शंकर भांगे यांनी भुतपूर्व भारतीय सैनिक स्थळसेनेमध्ये शिपाई या पदावरुन निवृत्ती घेतली. त्यानंतर मयत जीवनधर शंकर भांगे हे महाराष्ट्र पोलीस दलात शिपाई या पदावर कार्यरत झाले. मा.पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर सोलापूर या कार्यालयाच्या ग्रामीण जिल्हाधिकारी कार्यालय आवार, आस्थापनेवरील पोह/८६३ जीवनधर शंकर भांगे हे दि.३१/०५/२००३ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानंतर पोह/८६३ जीवनधर शंकर भांगे यांना PPO NO.POMA/१८२४१९ या पीपीओ क्रमांकाने निवृत्तीवेतन सुरू होते. यातील मयत जीवनधर शंकर भांगे याची पत्नी व अर्जदार नं.१ ते ४ यांची आई विश्रांतीबाई जीवनधर भांगे या निवृत्तीवेतन धारक यांच्या पुर्वीच दिनांक १७/०४/१९९८ रोजी मयत झाल्या आहेत. मयत जीवनधर शंकर भाँगे व मयत विश्रांतीबाई जीवनधर भांगे यांना अर्जदार नं.१ ते ४ हे चार मुली हे कायदेशीर वारस होते व आहेत. यातील अर्जदार नं.१ हिचे पती कै.सतिश हनुमंत परबत हे दि.०७/०५/२०२१ रोजी मयत झाले. यातील अर्जदार नं.१ हिने यातील अर्जदार नं. २ ते ४ हिच्या संम्मतीने घेवुन अर्जदार नं.१ हिने अर्जदाराचे मयत वडिल जीवनधर शंकर भांगे यांना मिळणारी पेन्शन मिळणेबाबत दि. ३०/०७/२०२५ रोजी मा. पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर या कार्यालय यांच्याकडे अर्ज केला व पेन्शनची मागणी केली. त्यानंतर मा. पोलीस अधीक्षक कार्यालय, सोलापूर ग्रामीण जिलाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर या कार्यालयांनी क्र.५७-फ/लेखा-११/मयत पेन्शन/परबत/२०२५ सोलापूर ग्रामीण ११/२०२५ च्या १८/०९/२०२५ रोजीच्या पत्राने सक्सेशन सर्टीफिकेट (वारसाहक्क प्रमाणपत्र) आणणेसाठी लेखी पत्राने सांगितले. अर्जदार नं. १ हिस पेन्शन मिळणेकामी अर्जदार नं. १ ते ४ यांचे नावे वारस दाखला मिळणेसाठी या कोर्टात वरील नंबरप्रमाणे अर्ज केला आहे.

त्या अर्थी वरील मागणी बाबत जर कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी मोहोळ येथील सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो, यांचे कोर्टात सदर प्रसिध्दिकरण झालेपासून ३० दिवसाचे आत किंवा मे. कोर्टानी नेमलेले ०१/०५/२०२६ रोजी हजर होवून स्वतः अथवा प्रतिनिधी मार्फत त्यांचे म्हणणे सादर करावे, जर मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास अर्जदाराचे मागणीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे ता.०४/०३/२०२६

(शिक्का) सही/- मा.न्यायालय अधिक्षक सि.ज. ज्यु. डि. मोहोळ


# बाभुळगाव उपकेंद्रात वाढीव क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर

## शेतकऱ्यांना दिलासा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** शेतीसाठी पाणी आणि योग्य दाबाने वीजपुरवठा अतिशय महत्त्वाचा असतो. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू होत असून शेतकऱ्यांना विजेची अडचण भेडसावू नये, यासाठी बाभुळगाव येथील वीज उपकेंद्रात वाढीव ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला आहे. त्यामुळे परिसरातील विजेचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे प्रतिपादन आमदार अभिजीत पाटील यांनी केले.

बाभुळगाव येथील वीज उपकेंद्रात बसविण्यात आलेल्या वाढीव ५ एमव्हीए ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन आमदार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यापूर्वी येथे ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर असल्यामुळे शेतकऱ्यांना वारंवार कमी दाबाच्या विजेमुळे अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन वाढीव क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविणे ही लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी असल्याचे सांगून आ. पाटील म्हणाले की, या परिसरातील रेल्वे लाईनजवळील विजेचा प्रश्नही येत्या काळात मार्गी लावण्यात येईल. सध्या विधानसभेचे अधिवेशन सुरू असून परिसरातील गावांचे प्रश्न व समस्या मांडण्यासाठी नागरिकांनी आपल्याकडे पाठवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी वसंत चव्हाण, दिलीप चव्हाण, दशरथ चव्हाण, महादेव चव्हाण, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष



अतुल चव्हाण, 'विठ्ठल'चे संचालक दिनकर चव्हाण, जनक भोसले, सरपंच अमोल कोरके, भारत कोरके, अमित साळुंखे, संतोष बागल, विलास भोसले, उपसरपंच श्रीपाद चव्हाण, जीवन पाटील, गणेश गांडुळे, उद्धव चव्हाण, अमोल चव्हाण, मोहन पाटील, ओंकार चव्हाण यांच्यासह महावितरणचे अधिकारी पाटणकर, सदानंद आदी उपस्थित होते.


## महाराष्ट्र शासन
## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर.

### दरपत्रक निविदा सुचना सन २०२५-२०२६

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. सोलापूर दूरध्वनी क्रमांक ०२१७-२७२६८६४ हे, १२ वा वित्त आयोग (शिल्लक व व्याजाची रक्कम) अंतर्गत मौजे बोरोटी ता.अक्कलकोट येथिल पाणी पुरवठा योजनेवर सौर यंत्रणा उभारणी करण्यासाठी प्रकारच्या कामाचा अनुभव असणाऱ्या जिल्हा परिषदेकडील नोदणीकृत विद्युत/यांत्रिकी ठेकेदार यांचेकडुन दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा मागवित आहेत.

उपरोक्त कामा बाबत निविदा, अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमुद केलेला असून कोऱ्या निविदासंच http:www.zpsolapur.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पहावयास मिळेल. दिनांक. ०५/०३/२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजले पासून डाऊनलोड करुन परिपुर्णरित्या भरलेल्या जाहिर निविदा दिनांक. १२/०३/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजे पर्यंत वा त्यापुर्वी स्विकारण्यात येतील. जाहिर निविदा दिनांक. १२/०३/२०२६ रोजी दुपारी १३.०० नंतर उघण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | कामाची मुदत | कोऱ्या निविदा किंमत | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे बोरोटी, ता.अक्कलकोट येथिल पाणी पुरवठा योजनेवर १२ किलोवॅट क्षमतेची सौर यंत्रणा उभारणी करणे. | ९९९०४८.०० | ९९००.०० | १५ दिवस | ५००.०० | अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणाऱ्या जिल्हा परिषदेकडील नोदणीकृत विद्युत/यांत्रिकी ठेकेदार |

१. उपरोक्त तक्त्यातील कामाचे नावा समोर रकाना क्रं. ४ व ६ मध्ये नमुद केलेल्या बयाणा व निविदा फी रक्कम स्टेट बॅक ऑफ इंडिया या बॅकेत चलनाद्वारे भरण्यात यावी.

२. निविदेच्या अटी शर्ती मध्ये बदल करणे, प्राप्त निविदा पैकी, एक किंवा सर्व निविदा कोणते ही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

-स्वाक्षरीत-
उपअभियंता(यांत्रिकी)
यांत्रिकी उपविभाग,
जिल्हापरिषद,सोलापुर

-स्वाक्षरीत-
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, सोलापुर



## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता सिक्युरिटी गार्ड त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd. Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 194

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | | | 2 | | 4 |
| | | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 3 |
| | 1 | | 3 | | | | | 7 |
| | 3 | | 6 | 5 | | 4 | 7 | 9 |
| | | 8 | 7 | | 3 | | 6 | 2 |
| | | | 2 | | | 5 | | 8 |
| 8 | 7 | | | | | | | |
| | 4 | 9 | | 1 | | | 2 | |
| 2 | 5 | | 4 | | | 8 | 9 | |

# महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलसाठी सोलापूरमधून सात जण रिंगणात







**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलच्या २५ सदस्यांच्या निवडणुकीसाठी सोलापूर जिल्ह्यातून सात वकिलांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये सोलापूर शहरातील पाच तर पंढरपूर येथील दोन वकिलांचा समावेश आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्यांमध्ये विद्यमान सदस्य ॲड. मिलिंद धोबडे, जिल्हा सरकारी वकील डॉ. प्रदीपसिंग राजपूत, ॲड. हेमा शिंदे, माजी जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष न्हावकर, बार असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष ॲड. आसीम बांगी, तसेच पंढरपूर येथील ॲड. पनश्री घाडगे आणि ॲड. महेश कसबे यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलच्या २५ जागांसाठी येत्या २४ मार्च रोजी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत सात जागा महिलांसाठी राखीव आहेत. राज्यातील सुमारे १ लाख ८० हजार वकील आपला मतदानाचा हक्क बजावणार असून २५ जागांसाठी एकूण १६० उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यापैकी दोन सदस्य स्वीकृत असणार आहेत.

### मतविभागणीचा फटका कोणाला?

बार कौन्सिल निवडणुकीचा प्रचार सध्या जोर धरत आहे. सोलापूरसह राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये उमेदवार वकिलांच्या गाठीभेटी घेत प्रचार करत आहेत. सोलापूर जिल्ह्यातून सात उमेदवार रिंगणात असल्यामुळे मतविभागणीचा फटका कोणाला बसणार आणि कोण बाजी मारणार, याकडे वकिलांचे लक्ष लागले आहे.

### उमेदवारांचा अनुभव

ॲड. मिलिंद धोबडे यांनी यापूर्वी दोन वेळा बार कौन्सिलची निवडणूक जिंकली असून त्यांना दोन वेळा प्रत्येकी एक वर्ष बार कौन्सिलचे अध्यक्ष होण्याचा मान मिळाला आहे. यंदा ते तिसऱ्यांदा नशीब आजमावत आहेत.

डॉ. प्रदीपसिंग राजपूत हे गेल्या सात वर्षांपासून जिल्हा सरकारी वकील म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दोन वर्षे सीबीआयचे विशेष सरकारी वकील तसेच पाच वर्षे महाराष्ट्र शासनाचे विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहिले आहे.

ॲड. हेमा शिंदे यांनी १९९६ ते २००० या कालावधीत सहायक सरकारी वकील आणि २००० ते २००५ दरम्यान जिल्हा सरकारी वकील म्हणून काम केले आहे. त्यांना वकिली क्षेत्रात ४२ वर्षांचा अनुभव आहे. ॲड. संतोष न्हावकर यांनी जिल्हा सरकारी वकील म्हणून काम पाहिले असून ते बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव राहिले आहेत.

ॲड. आसीम बांगी हे गेल्या आठ वर्षांपासून वकिली व्यवसायात असून ते बार असोसिएशनचे माजी उपाध्यक्ष आणि सोलापूर ॲडव्होकेट बिलामुदी सोसायटीचे अध्यक्ष आहेत.

# प्रलंबित बिलांमुळे कंत्राटदार संतप्त; ९ मार्चला शासनाविरोधात ठोस निर्णयाची शक्यता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील विविध विभागांकडील कंत्राटदारांची प्रलंबित देयके आणि विकासकामांच्या मंजुरीचा प्रश्न गंभीर बनला असून, या पार्श्वभूमीवर राज्यातील कंत्राटदारांची महत्त्वाची राज्यस्तरीय बैठक सोमवार दिनांक ९ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता कर्जत (मुंबईजवळ) येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत शासनाविरोधात ठोस निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

राज्यातील जवळपास सर्वच शासकीय विभागांकडील सुमारे ७७,५०० कोटी रुपयांची देयके कंत्राटदारांकडे प्रलंबित असल्याचा दावा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने केला आहे. शासनाच्या विविध विकासकामांची पूर्तता करूनही कंत्राटदारांना वेळेवर पैसे मिळत नसल्याने त्यांना मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

संघटनेचे राज्याध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले यांनी सांगितले की, नोव्हेंबर २०२४ मध्ये नवीन सरकार सत्तेत आल्यानंतर जवळपास १५ महिन्यांपासून राज्यातील अनेक नवीन विकासकामांना मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे राज्यातील विकास प्रक्रिया ठप्प झाली असून अनेक कामे थांबलेली आहेत.




भोसले पुढे म्हणाले की, आर्थिक वर्षाचा शेवट जवळ आला असताना वित्तीय संस्था आणि बँका कर्जाची वसुली करण्यासाठी कंत्राटदारांवर दबाव आणत आहेत. या आर्थिक तणावातून आतापर्यंत पाच तरुण कंत्राटदारांनी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र या गंभीर परिस्थितीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

कंत्राटदारांच्या मते, शेतीनंतर राज्यातील सर्वात मोठा रोजगार देणारा हा व्यवसाय असून जवळपास चार कोटी लोकांचा उदरनिर्वाह थेट किंवा अप्रत्यक्षपणे या क्षेत्रावर अवलंबून आहे. प्रलंबित देयके, नवीन कामांची मंजुरी नसणे आणि आर्थिक अडचणी यामुळे हा संपूर्ण व्यवसाय धोक्याच्या टप्प्यावर पोहोचला असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

या सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील आंदोलनाची दिशा ठरवण्यासाठी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ही राज्यस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीस राज्यातील सर्व विभागांतील कंत्राटदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राज्याध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले, महासचिव सुनील नागराळे, मंगेश आवळे, विरेंद्र जाधव आणि राजेश देशमुख यांनी केले आहे.

बैठकीत शासनाकडे प्रलंबित देयके तातडीने मिळावीत, नवीन विकासकामांना मंजुरी द्यावी तसेच कंत्राटदारांच्या आर्थिक प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याबाबत पुढील आंदोलनाची रणनीती ठरवली जाणार असल्याचेही संघटनांनी स्पष्ट केले आहे.

# 'भारत गौरव' पर्यटक ट्रेनद्वारे 'डिवाइन राजस्थान विथ उज्जैन यात्रा'

**27 मार्च रोजी सोलापूरहून विशेष ट्रेन प्रस्थान**



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ लिमिटेड (IRCTC) तर्फे 'भारत गौरव पर्यटक ट्रेन'च्या माध्यमातून 'डिवाइन राजस्थान विथ उज्जैन यात्रा' हे विशेष आध्यात्मिक आणि सांस्कृतिक टूर पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. ११ रात्री आणि १२ दिवसांच्या या विशेष यात्रेची सुरुवात २७ मार्च रोजी सोलापूर येथून होणार असून यात्रेकरूंना राजस्थानच्या ऐतिहासिक वारशाचा आणि उज्जैनच्या धार्मिक परंपरेचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

रेल्वे मंत्रालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या IRCTC या नवरत्न सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाने भारत सरकारच्या 'देखो अपना देश' आणि 'एक भारत श्रेष्ठ भारत' या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी ही विशेष पर्यटन यात्रा आयोजित केली आहे. देशातील समृद्ध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याचा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

IRCTC पश्चिम विभाग (मुंबई) चे ग्रुप जनरल मॅनेजर गौरव झा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही विशेष पर्यटक ट्रेन २७ मार्च रोजी सोलापूरहून प्रस्थान करणार आहे. या यात्रेसाठी प्रवाशांना पुणे, लोणावळा, कल्याण, वसई रोड आणि सूरत या प्रमुख स्थानकांवरून ट्रेनमध्ये चढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या यात्रेदरम्यान प्रवाशांना राजस्थान आणि मध्यप्रदेशातील अनेक प्रसिद्ध धार्मिक व पर्यटनस्थळांना भेट देण्याची संधी मिळणार आहे. उदयपूर येथील निसर्गरम्य तलावांचे सौंदर्य, नाथद्वारा येथे श्रीनाथजी मंदिराचे दर्शन, पुष्करचे पवित्र तीर्थक्षेत्र, जोधपूर व जयपूर येथील ऐतिहासिक किल्ले आणि राजवाडे, खाटू श्यामजी मंदिर तसेच उज्जैन येथील भगवान महाकालेश्वर ज्योतिर्लिंगाचे दर्शन या यात्रेत समाविष्ट आहे. त्यामुळे ही यात्रा धार्मिक अनुभूतीसोबतच राजस्थानच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवाचा परिचय करून देणारी ठरणार आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी आणि बजेटचा विचार करून या विशेष ट्रेनमध्ये तीन प्रकारच्या श्रेणी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. इकॉनॉमी क्लास (स्लीपर) साठी प्रति व्यक्ती ₹१९,९००, स्टँडर्ड क्लास (३ एसी) साठी ₹३१,९२० आणि कम्फर्ट क्लास (२ एसी) साठी ₹४१,८४० अशी शुल्करचना ठेवण्यात आली आहे.

सुमारे ७५० प्रवाशांची क्षमता असलेल्या या पर्यटक ट्रेनमध्ये सोलापूर, पुणे, कल्याण, वसई रोड आणि सूरत या प्रमुख स्थानकांवर चढण्याची आणि उतरण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

IRCTC पश्चिम विभाग, मुंबईचे जनसंपर्क अधिकारी डॉ. ए. के. सिंह यांनी सांगितले की प्रवाशांच्या सोयीसाठी ही यात्रा 'ऑल-इन्क्लुसिव्ह पॅकेज' स्वरूपात तयार करण्यात आली आहे. या पॅकेजमध्ये रेल्वे प्रवास, शुद्ध शाकाहारी भोजन, हॉटेलमधील निवास व्यवस्था, स्थानिक पर्यटनासाठी बस सेवा, टूर एस्कॉर्ट तसेच प्रवाशांसाठी प्रवास विमा यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि संस्मरणीय प्रवासाचा अनुभव मिळणार आहे.

या यात्रेबाबत अधिक माहिती आणि बुकिंगसाठी इच्छुक प्रवाशांनी IRCTC च्या अधिकृत पर्यटन संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा जवळच्या IRCTC पर्यटन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दक्षिण सोलापूरमध्ये आधुनिक कृषी भवन व ॲग्री मॉल उभारण्याचा प्रस्ताव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात आधुनिक कृषी भवन व कृषी बाजारपेठ (ॲग्री मॉल) उभारण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मंत्रालयात झालेल्या बैठकीत मांडण्यात आला. महाराष्ट्राचे कृषीमंत्री दत्तात्रेय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली असून आमदार सुभाष देशमुख यांच्या पुढाकाराने ती आयोजित करण्यात आली.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कृषी विकास, सिंचन सुविधा आणि शेतकरी हिताच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. कृषी पायाभूत सुविधा मजबूत करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.

दक्षिण सोलापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या ठिकाणी सुसज्ज व आधुनिक कृषी भवन उभारण्याचा प्रस्ताव बैठकीत मांडण्यात आला. या भवनामध्ये मध्यवर्ती कृषी कार्यालय, शेतकरी निवास (रेस्ट हाऊस), प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र तसेच शेतकरी आणि ग्राहक यांच्यात थेट व्यवहार होण्यासाठी कृषी बाजारपेठ अर्थात ॲग्री मॉल उभारण्याचा विचार आहे. यामुळे मध्यस्थांची साखळी कमी होऊन शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारभाव मिळण्यास मदत होणार आहे.

तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यात सिंचन क्षमता वाढविण्यासाठी सामुदायिक व वैयक्तिक शेततळ्यांची संख्या वाढविण्याबाबत चर्चा झाली. सीना व भीमा नदीच्या पाण्याचा योग्य वापर करून जलसंधारण व सूक्ष्म सिंचन योजना प्रभावीपणे राबविण्यावर भर देण्यात आला. तालुक्यातील काही भागात चुकीच्या पाणी व्यवस्थापनामुळे जमिनी क्षारयुक्त होत असल्याने त्या जमिनींच्या पुनर्वसनासाठी विशेष योजना राबविण्याची गरज व्यक्त करण्यात आली. यासाठी मृदा आरोग्य सुधारणा कार्यक्रम व जनजागृती मोहिमा राबविण्याबाबतही चर्चा झाली.

दक्षिण सोलापूर परिसरात ऊस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या लक्षात घेता येथे स्वतंत्र ऊस संशोधन केंद्र स्थापन करण्याचा प्रस्तावही बैठकीत मांडण्यात आला. या माध्यमातून ऊस वाण संशोधन, कीड व रोग नियंत्रण तसेच उत्पादनवाढीसाठी तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. तसेच 'एक गाव - एक पीक' योजना प्रभावीपणे राबविणे आणि बोगस बियाणे, खते व कीटकनाशक विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

दक्षिण सोलापूर हा कृषीप्रधान भाग असल्याने येथील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, सिंचन सुविधा वाढविणे आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले.

# गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविषयी उद्या सोलापूरात मार्गदर्शन कार्यक्रम




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे निदान, उपचार व प्रतिबंधक लसीकरण या विषयावर तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शनपर व्याख्यान ८ मार्च रोजी हॉटेल बालाजी सरोवर येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती डॉ. आयएसपीएटीचे अध्यक्ष डॉ. मिलिंद शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा कार्यक्रम सोलापूर ओबीसीतेत्रिक्स अँड गायनाइकॉलॉजिकल सोसायटी (स्त्री रोग व प्रसूती शास्त्र संघटना, सोलापूर) आणि इंडियन मेडिकल असोसिएशन सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात डॉ. रोहिणी देशपांडे या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाला कारणीभूत ठरणाऱ्या ह्यूमन पपईल्लोमाविरस (एचपीव्ही) विषाणूविषयी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच डॉ. मिलिंद शहा हे एचपीव्ही प्रतिबंधक लसीकरण या विषयावर माहिती देणार आहेत.

कार्यक्रमादरम्यान विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या काही महिलांचा सत्कारही करण्यात येणार आहे. या मार्गदर्शन कार्यक्रमास सर्व महिला व पुरुष डॉक्टरांना उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

प्रत्येक महिलेला निरोगी आयुष्य जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्या दृष्टीने महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस एसओजीएसच्या अध्यक्षा डॉ. सुजाता कुलकर्णी, सचिवा डॉ. केतकी जोशी,इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. मंजूषा शहा आदी उपस्थित होत्या.

# निकृष्ट कामाच्या आरोपांनंतर स्मशानभूमीच्या बांधकामाची पाहणी




**वैराग (कटूसत्य वृत्त):-** वैराग येथे उभारण्यात येत असलेल्या संत तुकाराम वैकुंठधाम स्मशानभूमीच्या बांधकामावर निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याच्या आरोपांमुळे परिसरातील वातावरण तापले आहे. सुमारे सव्वा कोटी रुपयांचा निधी खर्चून उभारल्या जाणाऱ्या या महत्त्वाच्या प्रकल्पाकडे नागरिकांचेही लक्ष वेधले गेले आहे. या पार्श्वभूमीवर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर यांनी नगरसेवकांसह प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करत कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले.

वैराग व परिसरातील नागरिकांसाठी आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी स्मशानभूमी उभारण्याचा संत तुकाराम वैकुंठधाम हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात आहे. अंत्यसंस्काराच्या वेळी कुटुंबीयांना स्वच्छ, सुसज्ज आणि सन्मानजनक सुविधा मिळाव्यात या उद्देशाने या ठिकाणी विविध सोयीसुविधा उभारल्या जात आहेत. मात्र कामाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच बांधकामाच्या गुणवत्तेबाबत काहींनी शंका उपस्थित केल्याने स्थानिक पातळीवर राजकीय वातावरण तापले आहे.

दोन दिवसांपूर्वी विरोधी गटातील माजी ग्रामपंचायत सदस्य अरुण सावंत यांनी पत्रकार परिषद घेऊन स्मशानभूमीच्या बांधकामातील कथित त्रुटींवर प्रकाश टाकत कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. यानंतर या विषयाची गंभीर दखल घेत उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर यांनी नगरसेवकांसह प्रत्यक्ष स्थळाला भेट देऊन बांधकामाची पाहणी केली. पाहणीदरम्यान बांधकामातील काही तांत्रिक बाबींची तपासणी करण्यात आली तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून माहितीही घेण्यात आली.

पाहणीनंतर बोलताना निरंजन भूमकर म्हणाले की, संपूर्ण काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप अतिशयोक्तीपूर्ण आहे; मात्र काही ठिकाणी तांत्रिक त्रुटी निदर्शनास आल्या आहेत. त्या तात्काळ दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात आले असून संबंधित ठेकेदाराला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार आहे. 'कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. नागरिकांच्या पैशातून उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पात पारदर्शकता आणि दर्जा या दोन्ही बाबींची काळजी घेतली जाईल,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी सिमेंटचा दर्जा ४३ ते ५३ ग्रेडचा वापरण्यात येत असल्याचे सांगून '३५ टक्के फ्लॅश' ही सिमेंटची ग्रेड नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या प्रकरणामुळे नगरपंचायतीच्या कामकाजावर नागरिकांचे लक्ष केंद्रीत झाले असून कामाची गुणवत्ता, निधीचा योग्य वापर आणि पारदर्शकता या बाबींवर अधिक काटेकोरपणे लक्ष ठेवले जाईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# मंडळ अधिकाऱ्याच्या चालकाला ७ हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला तालुक्यातील संगेवाडी मंडळ अधिकारी कार्यालयात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुरुवारी (ता. ५) सापळा रचून मंडळ अधिकाऱ्याच्या खाजगी चालकाला ७ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडल्याची कारवाई केली. या प्रकरणी मंडळ अधिकारी विजया महारुद्र नाईक (रा. इसबावी, ता. पंढरपूर) व त्यांचा खाजगी चालक वैभव पिराजी मोरे (रा. मुंढेवाडी, ता. पंढरपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक रविंद्र हिम्मत लांभाते यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सांगोला पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तक्रारदार विनोद सिताराम सातपुते यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या आईच्या नावावर खरेदी केलेल्या शेतजमिनीच्या खरेदी दस्तावर आलेल्या हरकतीचा निकाल त्यांच्या बाजूने लावून सातबारा उताऱ्यावर नाव नोंद करण्यासाठी मंडळ अधिकारी विजया नाईक यांच्या वतीने १० हजार रुपयांची लाच मागण्यात आली होती. तडजोडीनंतर ही रक्कम ७ हजार रुपयांवर ठरविण्यात आली.

या तक्रारीची पडताळणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पंचासमक्ष केली. त्यावेळी मंडळ अधिकारी नाईक यांनी चालक वैभव मोरे यांच्या मार्फत लाच मागणीस दुजोरा दिल्याचे आढळून आले. त्यानंतर गुरुवारी संगेवाडी मंडळ अधिकारी कार्यालयात सापळा रचण्यात आला.

या सापळा कारवाईदरम्यान चालक वैभव मोरे यांनी तक्रारदाराकडून ७ हजार रुपयांची लाच स्वीकारताच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले. या कारवाईत लाचेची रक्कम, आरोपीचा शर्ट, मोबाईल तसेच चित्रीकरणाचे मेमरीकार्ड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणाचा पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक शैलेश पवार करीत आहेत. तालुक्यात अवैध वाहतूक रोखण्यासाठी गेलेल्या महसूल पथकावर हल्ला केल्याची घटना ताजी असतानाच महसूल अधिकाऱ्यांवर लाच घेताना लगेच दुसरी घटना घडल्याने तालुक्यात चर्चा ऊत आला आहे.

# आदिवासी बांधवांचा विश्वास जिंकून परिवर्तन घडविले- डॉ. मंदाकिनी आमटे




**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** भामरागडच्या दुर्गम जंगलात काम सुरू केले तेव्हा रस्ते, वीज, पाणी अशी कोणतीही सुविधा नव्हती. आदिवासी बांधवांना आमची भाषा समजत नव्हती आणि आरोग्यसेवेची कोणतीही साधनेही नव्हती. मात्र सातत्याने सेवा दिल्यामुळे त्यांचा विश्वास जिंकता आला आणि त्यांच्या जीवनात परिवर्तन घडू लागले, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेविका डॉ. मंदाकिनी आमटे यांनी केले.

शुक्रवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सातव्या नामविस्तार दिनानिमित्त तसेच अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून ज्येष्ठ समाजसेविका डॉ. मंदाकिनी आमटे यांना 'अहिल्यार' पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर हे होते. यावेळी व्यासपीठावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, पदमश्री डॉ. प्रकाश बाबा आमटे, प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, रोप आणि ५१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. मान्यवरांचा परिचय डॉ. अनिल घनवट यांनी करून दिला. मानपत्राचे वाचन सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

डॉ. मंदाकिनी आमटे म्हणाल्या की, १९७२ साली विवाहानंतर पती डॉ. प्रकाश आमटे यांच्यासह गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील हेमलकसा येथे आदिवासी बांधवांसाठी कार्य सुरू केले. त्या काळी तेथील परिस्थिती अत्यंत कठीण होती. रस्ते, पूल, वीज, पाणी तसेच संवादाची साधने नव्हती. सुरुवातीला आदिवासी बांधवांना आमची भाषा समजत नव्हती. मात्र त्यांची भाषा शिकून आरोग्यसेवा देण्यास सुरुवात केली. अंधश्रद्धेमुळे अनेक जण मांत्रिकांकडे जात असत; परंतु सातत्याने उपचार करून विविध आजार बरे झाल्यानंतर लोकांचा विश्वास बसू लागला. आरोग्यसेवेबरोबरच शेती आणि शिक्षण क्षेत्रातही काम सुरू करण्यात आले. आदिवासी समाज मुख्य प्रवाहात यावा यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याची जाणीव झाल्यानंतर मुलांसाठी शाळा सुरू केली. आज त्या शाळेतील विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत यशस्वी होत असल्याचे पाहून समाधान वाटते, असे त्यांनी सांगितले. अहिल्यादेवींच्या नावाने पुरस्कार दिल्यने त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे म्हणाले, वडील बाबा आमटे यांनी आनंदवनातून समाजसेवेची प्रेरणा दिली. त्या प्रेरणेनेच आम्ही हेमलकसा येथे आदिवासी बांधवांसाठी कार्य सुरू केले. सेवाभावाने सातत्याने काम केल्यास समाजाचा विश्वास संपादन करता येतो. कोणतेही काम लहान समजू नये; मनापासून आणि समर्पित भावनेने केलेल्या कार्यातूनच समाजात परिवर्तन घडते, असे ते म्हणाले.

डॉ. संजीव सोनवणे यांनी सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सुमारे तीनशे वर्षांपूर्वी समाजपरिवर्तनाचा आदर्श घालून दिला. त्याच धर्तीवर डॉ. मंदाकिनी आमटे यांनी आदिवासी बांधवांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे महान कार्य केले आहे. त्यांच्या कायार्चा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर म्हणाले की, लोकाभिमुख समाजसेवा आणि न्यायप्रिय राज्यकारभाराचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. त्यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार डॉ. मंदाकिनी आमटे यांना प्रदान केल्याने पुरस्काराची प्रतिष्ठा अधिक उंचावली आहे. यंदापासून हा पुरस्कार देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला असून तरुणांनी आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

नामविस्तार दिनानिमित्त रांगोळी स्पर्धा, लोकवादन, ग्रंथदिंडी व ग्रंथप्रदर्शन, निबंध स्पर्धा, लोककला सादरीकरण तसेच वृक्षारोपण आदी कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमास उद्योजिका सुवासिनी शहा, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, पद्मजादेवी मोहिते पाटील, एम. डी. कमळे, प्रा. सचिन गायकवाड, ॲड. मल्लिनाथ शहाबादे, यतिराज होनमाने, प्रा. जैनुद्दीन मुल्ला आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी केले. आभार विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी मानले.